आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
२४ जून २०२६ - बुधवार

**<u>ठळक बातम्या</u>**

देशातल्या खाजगी क्षेत्रातल्या कंपन्यांकडून होणारी विक्री या आर्थिक वर्षात १० टक्क्यापेक्षा जास्त वाढल्याचा रिझर्व्ह बँकेचा अहवाल

होर्मुजच्या सामुद्रधुनीतून एक तात्पुरता सागरी मार्ग खुला करण्याची ओमानची घोषणा

जागतिक बाजारात कच्च्या तेलाचे दर घसरुन ७४ अमेरिकी डॉलर्सवर

**आणि**

महाराष्ट्रात अनेक ठिकाणी मोसमी पावसाची दमदार हजेरी

**<><><><><>**

देशातल्या खाजगी क्षेत्रातल्या कंपन्यांकडून होणारी विक्री या आर्थिक वर्षात १० पूर्णांक १ दशांश टक्क्यानी वाढली असल्याचं रिझर्व्ह बँकेच्या आज सादर केलेल्या अहवालात म्हटलं आहे. या अहवालात देशातल्या ४ हजार २७८ कंपन्यांच्या माहितीच विश्लेषण करण्यात आलं आहे. खाजगी क्षेत्रातल्या उत्पादन कंपन्यांचा या वाढीत मोठा वाटा आहे. कच्च्या मालाच्या किमतीत वाढ झाली असूनही त्यांच्या विक्रीत गेल्या आर्थिक वर्षाच्या तुलनेत  १० पूर्णांक ८ दशांश टक्के वाढ झाल्याचं अहवालात म्हटलं आहे.

सेवा क्षेत्रात माहिती तंत्रज्ञान कंपन्यांच्या विक्रीत ७ पूर्णांक ९ दशांश टक्के वाढ झाल्याचं अहवालात म्हटलं आहे.

**<><><><><>**

होर्मुजच्या सामुद्रधुनीतून एक तात्पुरता सागरी मार्ग खुला करण्याची घोषणा ओमाननं केली आहे. पश्चिम आशियातल्या संघर्षामुळे होर्मुजच्या सामुद्रधुनीतून बंद झालेली मालवाहतूक यामुळे सुरू होणार आहे. संयुक्त राष्ट्राच्या आंतरराष्ट्रीय सागरी संस्थेच्या सहाय्यानं हा मार्ग खुला केला जाणार असल्याचं ओमान सरकारनं सांगितलं. कोणत्याही शुल्काशिवाय जहाजांना मार्ग वापरण्याची मुभा दिली जाईल असं ओमाननं म्हटलं आहे.

पश्चिम आशियातल्या संघर्षामुळे या प्रदेशात अकरा हजारापेक्षा जास्त खलाशी अडकून पडले आहेत, त्यांना टप्प्याटप्प्यानं बाहेर काढण्याचं नियोजन केलं असल्याचं आंतरराष्ट्रीय सागरी संस्थेनं म्हटलं आहे.

<><><><><>

जागतिक स्तरावर आज कच्च्या तेलाचे दर घसरून गेल्या चार महिन्यातल्या सर्वात नीचांकी पातळीवर आले आहेत. ब्रेंट कच्च्या तेलाचा भाव ३ टक्क्यानी कमी होऊन ७४ अमेरिकन डॉलर्सपर्यंत गेला, तर वेस्ट टेक्सास इंटरमिजिएट कच्च्या तेलाचे दर ७१ डॉलर्सपर्यंत खाली आले आहेत.

<><><><><>

महाराष्ट्रात बाल विवाहाचं प्रमाण कमी करण्यासाठी लग्न पत्रिकेत वर आणि वधूची जन्मतारीख नमूद करण्यासाठी विधी आणि न्याय, तसंच ग्रामविकास विभागाच्या मदतीनं कार्यवाही करण्याचे प्रयत्न सुरू असल्याची माहिती महिला बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी आज विधानसभेत दिली. राज्यातलं बालविवाहाचं प्रमाण १० टक्क्याच्या आत आणण्याचे प्रयत्न सुरू आहेत. ज्या जिल्ह्यांमधे हे प्रमाण जास्त आहे तिथं विशेष मोहीम राबवली जात आहे. राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षणानुसार २०१९-२१ या कालावधीत देशात बालविवाहाचं प्रमाण २३ टक्क्यापेक्षा जास्त आणि राज्यात सुमारे २२ टक्के होतं. २०२३-२४ मध्ये काही जिल्ह्यात झालेल्या सर्वेक्षणानुसार हे प्रमाण राज्यात १९ पूर्णांक ७ दशांश टक्के झाल्याची माहिती त्यांनी दिली.

राज्याच्या काही भागांमध्ये मान्सूनला सुरुवात झाली असली तरी शेतकऱ्यांनी पेरणीची घाई करू नये, असा सल्ला कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी विधानसभेत दिला. शेतकऱ्यांनी प्रथम आपल्या शेतातली ओलाव्याची पातळी तपासून, पुरेसा ओलावा असल्याची खात्री झाल्यावरच पेरणी करावी. हवामानातल्या इतर अनिश्चिततेचा सामना करण्यासाठी शेतकऱ्यांना कृषी विभाग मदत करेल, असं आश्वासनही भरणे यांनी दिलं.

पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी शोक प्रस्ताव वाचताना झालेल्या चुकांबद्दल विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी दिलगिरी व्यक्त केली. छापील भाषणाची प्रत अस्पष्ट होती, त्यात काही चुका होत्या त्यामुळे वाचताना चूक झाल्याचं ते म्हणाले.

<><><><><>

नाशिकमध्ये TCS कंपनीत महिला कर्मचाऱ्यांचा विनयभंग, लैंगिक अत्याचार, धर्मांतराचा प्रयत्न आणि धार्मिक भावना दुखावल्याचं प्रकरण, अशा घटनांचा अभ्यास करण्यासाठी, याबाबत सध्या लागू असलेले कायदे आणि नियमांचा अभ्यास करून बदल

सुचवण्यासाठी विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांच्या महिला सदस्यांची समिती स्थापन करण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी विधान परिषदेत केली. नाशिक प्रकरणी एकंदर ९ गुन्हे दाखल झाले असून संबंधित ऑपरेशन मॅनेजरवरही गुन्हा दाखल केल्याची माहिती त्यांनी दिली. SITनं या प्रकरणाची चौकशी जवळपास पूर्ण केली असून अंतिम अहवाल लवकरच येईल, असं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

नैर्ऋत्य मोसमी पावसानं महाराष्ट्राचा बहुतांश भाग व्यापला असून येत्या आठवडाभरात राज्यात सर्वदूर पाऊस होईल असा अंदाज आहे. ऐकूया सविस्तर वृत्त आमच्या प्रतिनिधीकडून....

**- - - होल्ड- व्हीसी- कौस्तुभ- - -**

*(मुंबईत कालपासून पावसानं संततधार धरल्यानं तापमान कमी होऊन मुंबईकरांना उकाड्यापासून दिलासा मिळाला. शहराच्या सखल भागात पाणी साचल्यानं रस्ता आणि रेल्वे वाहतुकीवर परिणाम झाला. रल्वे रुळांखाली जमीन खचल्यानं ट्रान्सहार्बर सेवा पहाटे काही काळ बंद होती. दुपारनंतर पावसाला उतार पडला आहे.*

*ठाणे शहरात मुसळधार पावसामुळे काही ठिकाणी झाडं उन्मळून पडली. सखल भागात पाणी साचून वाहतुकीचा खोळंबा झाला. काही घरांचं नुकसान झालं.*

*पालघर, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातही पावसानं जोर धरला असून अनेक ठिकाणी पडझडीच्या घटना झाल्या. अनेक ठिकाणी वीज पुरवठा खंडित झाला. लांजा तालुक्यात आरगाव इथं बांध  कोसळून एका महिलेचा मृत्यू झाला. मुंबईसह कोकणातल्या सर्व जिल्ह्यांना हवामानविभागानं ऑरेंज अलर्ट दिला आहे. मच्छिमारांनी समुद्रात जाऊ नये असा इशारा दिला आहे. दक्षिण मध्य महाराष्ट्राच्या घाटमाथ्यावर तसंच मराठवाड्यात तुरळक ठिकाणी विजांचा कडकडाट आणि मेघगर्जनेसह वादळी पावसाची शक्यता आहे.)*

**<><><><><>**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे ६ खासदार पक्षातून बाहेर पडल्याप्रकरणी खासदार अरविंद सावंत आणि अनिल देसाई यांनी आज लोकसभा सभापती ओम बिरला यांची भेट घेतली. एका पक्षाच्या चिन्हावर निवडून आलेले खासदार दुसऱ्या पक्षात जाऊ शकत नाहीत, त्यांची संख्या पक्षाच्या एकूण खासदारांच्या दोन तृतीयांश असली तरीही

संविधानातल्या १०व्या अनुसूचीतल्या तरतुदीनुसार हे करता येणार नाही असं आपण सभापती बिरला यांना सांगितलं, अशी माहिती अनिल देसाई यांनी नंतर वार्ताहरांना दिली. या प्रकरणी सभापती संविधान आणि लोकशाहीचा आदर करणारा निर्णय घेतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

<><><><><>

अमेरिकन खुल्या सुपर ३०० बॅडमिंटन स्पर्धेत ट्रिसा जॉली आणि गायत्री गोपीचंद यांनी स्पेनच्या जोडीचा पराभव करून दुसऱ्या फेरीत प्रवेश केला. ट्रिसा आणि गायत्रीने स्पेनच्या पॉला लोपेझ आणि लुसिया रॉड्रिग्ज यांना २१-१२, १४-२१, २१-१३ अशी मात दिली. पुढच्या फेरीत त्यांचा सामना जपानच्या सुमिरे नकाडे आणि मियू ताकाहाशी यांच्याबरोबर होणार आहे. पुरुष एकेरी प्रकारात रौनक चौहान याने मुख्य फेरीत आपलं स्थान निश्चित केलं आहे. त्याने सुरुवातीला फ्रान्सच्या एनोगॅट रॉयचा २१-१९, २१-१६ असा पराभव केला आणि त्यानंतर चायनीज तैपेईच्या कुओ कुआन लिनवर १३-२१, २१-१४,२१-१० अशी मात केली.

<><><><><>

फिफा विश्वचषक स्पर्धेत आज रात्री कॅनडातल्या वॅक्युअर इथे कॅनडा आणि स्वित्झलंड यांच्यात सामना होईल. भारतातून हा सामना रात्री साडे बारा वाजता पाहता येईल. वॉशिंग्टन इथल्या सिएटल स्टेडियमवर बोस्निया हर्जेगोविना यांचा सामना कतारशी होईल.

<><><><><>

माहिती अधिकार कायद्यातले प्रस्तावित बदलाच्या विरोधात ज्येष्ठ समाजसेवक आण्णा हजारे यांनी ५ जुलैपासून उपोषण करण्याचा इशारा दिला आहे, त्या पार्श्वभूमीवर राज्याचे मुख्य माहिती आयुक्त राहुल पांडे यांनी आज हजारे यांची भेट घेतली. मात्र ही बैठक निष्फळ ठरली असून आण्णा हजारे यांनी आपण उपोषणावर ठाम असल्याचं म्हटलं आहे.

तर आपण सरकारचा निरोप घेऊन आलो नव्हतो, आंदोलनाबाबत सरकार आणि आण्णा हजारे यांनी निर्णय घ्यायचा आहे, असं आयुक्त राहुल पांडे बातमीदारांशी बोलताना म्हणाले.

<><><><><>

केंद्रीय विद्यालयांसाठीच्या छत्तिसाव्या राष्ट्रीय युवा सांसद स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ उद्या नवी दिल्लीत होणार आहे. या समारंभात संसदीय कार्य राज्यमंत्री अर्जुनराम मेघवाल पारितोषिकं प्रदान करतील. ही स्पर्धा देशभरात २५ विभागातल्या २०० शाळांमध्ये आयोजित करण्यात आली होती. युवा सांसद योजनेचा उद्देश तरुण पिढीमध्ये स्वयंशिस्त, मतांतराविषयी सहिष्णुता, योग्य प्रकारे मते मांडणे आणि लोकशाही जीवनशैलीशी संबंधित इतर सद्गुण रुजवणे हा आहे.

पुण्याच्या हवाईदल तळावरच्या पीएमश्री केंद्रीय विद्यालयाचा प्रादेशिक विजेत्यांमधे समावेश आहे.

**<><><><><>**

युरोपमधल्या अनेक देशात उष्णतेची लाट आली असून ही बाब आरोग्यासाठी गांभीर्यानं घेण्यासारखी असल्याचं जागतिक आरोग्य संघटनेनं म्हटलं आहे.फ्रान्समधला कालचा दिवस हा सर्वात जास्त उकाड्याचा ठरला.तिथल्या काही भागातलं तापमान ४४ पूर्णांक ३ अंश सेल्शियस वर पोहोचलं.यामुळे ४८ लोक मृत्युमुखी पडले. स्पेन मध्येही उन्हाळा वाढला आहे. युनाइटेड किंग्डम इथेही मध्य आणि दक्षिण इंग्लंडसाठी तिथल्या हवामान विभागाने धोक्याचा इशारा दिला असून तापमान ४० अंश सेल्शियस पर्यंत जाण्याची शक्यता वर्तवली आहे. इटलीमधल्या १६ शहरांसाठी उष्णता वाढण्याचा इशारा देण्यात आला आहे.

**//<><><><><>//**